**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रातल्या मतदारांनी देशभक्ती, राजकीय समज आणि दूरदृष्टी दाखवून भाजपाला सलग १० वर्षं सर्वाधिक पसंती दिली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रचारसभेत प्रतिपादन

- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठीचा प्रचार शिगेला

- सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या अधिकृतपणे निवृत्त होणार, न्यायमूर्ती संजीव खन्ना स्वीकारणार पदभार

- जागतिक हॉकी संघटनेचे पुरस्कार जाहीर, भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंग वर्षातला सर्वोत्कृष्ट खेळाडू तर सर्वोत्तम गोलरक्षक ठरला पी. आर. श्रीजेश

**आणि**

- पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात क्वेट्टा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या बॉम्बस्फोटात २४ जणांचा मृत्यू, ४० हून अधिक जखमी

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांसाठीच्या प्रचाराने कमालीचा वेग घेतला आहे. विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा आणि पत्रकार परिषद आज राज्यभरात होत आहेत. वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या आणि इतर समाजमाध्यम व्यासपीठांवर आपापली भूमिका मांडून उमेदवार आणि त्यांच्या पक्षांचे प्रचारक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

९ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**<><><><>**

महाराष्ट्राने २०१४ ते २०२४ अशी दहा वर्षं भाजपाला सातत्याने संधी दिली, महाराष्ट्रवासीयांची देशभक्ती, राजकीय समज आणि दूरदृष्टी यातून दिसते, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अकोला इथं एका प्रचारसभेत ते बोलत होते. महाराष्ट्राच्या नागरिकांनी दाखवलेल्या या विश्वासामुळे महाराष्ट्राची सेवा करण्यात वेगळंच सुख मिळतं, असंही ते म्हणाले. पालघर जिल्ह्यातलं वाढवण बंदर देशातलं सर्वात मोठं बंदर असून त्यासाठी ८० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चार कोटी गरिबांना घरं दिली, शिवाय तीन कोटी नवीन घरं बांधायला सुरुवात केली असून यामुळे महाराष्ट्रातल्या लाखो गरिबांना पक्की घरं मिळतील, असं त्यांनी नमूद केलं. केंद्र सरकारनं मराठी भाषेला दिलेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव केला आहे, असंही प्रधानमंत्री म्हणाले. राज्यात टेक्सटाइल पार्कच्या उभारणीमुळे कापूस शेतकऱ्यांसाठी नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडी आणि काँग्रेसवर त्यांनी भ्रष्टाचाराचा, घराणेशाहीचा आरोप केला आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी पुन्हा एकदा राज्यात महायुतीचं सरकार निवडून देण्याची विनंती मतदारांना केली.

**<><><><>**

महायुती सरकारच्या काळात सरकारच्या तिजोरीवर पहिला अधिकार हा शेतकरी, लाडक्या बहिणी आणि लाडक्या भावांचा होता, असं शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. ते आज परभणीत प्रचारसभेत बोलत होते. महायुती सरकारनं साडे सात अश्वशक्ती पम्पाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचं वीज बील माफ केलं, तसंच शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला, असं शिंदे म्हणाले.

**<><><><>**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज नागपूरमध्ये दीक्षाभूमी इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला तसंच गौतम बुद्ध यांना अभिवादन केलं. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या वतीने खर्गे यांचं स्वागत करण्यात आलं. यावेळी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार उपस्थित होते. यानंतर मल्लिकार्जुन खरगे वार्ताहरांशी संवाद साधतील. दुपारी साडे तीन वाजता अमरावती इथं तर संध्याकाळी सव्वा सात वाजता नागपूर उत्तर विधानसभा मतदारसंघात ते प्रचारसभेला संबोधित करणार आहेत.

महाराष्ट्रात यावेळी निवडणूक लढवणाऱ्या पक्षांची आणि उमेदवारांची संख्या जास्त असून त्यामुळे उमेदवारांचा कस लागणार असल्याचं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. आज एका वृत्तवाहिनीला ते मुलाखत देत होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे हे यवतमाळ इथं प्रचारसभा घेणार आहेत.

**<><><><><>**

झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यातलं मतदान १३ नोव्हेंबरला होणार आहे, त्यामुळं तिथं प्रचार संपायला अवघे तीन दिवस उरले आहेत. केंद्रीय गृहमंत्री आणि भाजप नेते अमित शहा आज झारखंडच्या जमशेदपूरमधील छत्रपूर, हजारीबाग आणि पोटका विधानसभा मतदारसंघात जाहीर सभांना संबोधित करणार आहेत. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज धनबाद जिल्ह्यात बागमारा विधानसभा मतदारसंघ आणि पूर्व सिंगभूम जिल्ह्यात जमशेदपूर इथं निवडणूक प्रचार सभा घेणार आहेत. झारखंड मुक्ती मोर्चाचे ज्येष्ठ नेते आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या सभा रांची, खरसावा आणि मंदार मतदारसंघात होणार आहेत, तर राजद, एजेएसयू आणि डाव्या पक्षांचे नेते राज्याच्या विविध भागांमध्ये निवडणूक सभांना संबोधित करतील. झारखंडमधे दुसऱ्या टप्प्यात २० नोव्हेंबरला मतदान होणार असून त्यासाठीचा प्रचारही वेगाने सुरु आहे.

<><><><>

विधानसभा निवडणूकीच्या निमित्तानं स्वीप अंतर्गत मतदार जनजागृतीसाठी 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. मुंबईत घाटकोपर रेल्वे स्थानकाबाहेर आज पथनाट्य सादर करुन नागरिकांना त्यांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग वाढवण्याबाबत आवाहन करण्यात आलं.

<><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><>

सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या रविवारी अधिकृतपणे निवृत्त होणार आहेत. त्यानंतर न्यायमूर्ती संजीव खन्ना देशाचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. अनेक ऐतिहासिक निर्णयांसाठी प्रसिद्ध असलेल्या न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा काल न्यायालयात शेवटचा दिवस होता. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या निकालांमध्ये अयोध्या जमीन वाद, दोन प्रौढांनी सहमतीने ठेवलेल्या समलिंगी संबंधांना मान्यता आणि अविवाहित महिलांना गर्भपाताचा अधिकार यांचा समावेश आहे. त्यांचे हे निर्णय समाज आणि राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे होते. चंद्रचूड यांनी ११ नोव्हेंबर २०२२रोजी सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उत्तराखंडच्या २५व्या स्थापनादिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. उत्तराखंड राज्यानं विविध क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करुन विकासाची नवी उंची गाठली आहे, असं त्यांनी यानिमित्त आयोजित कार्यक्रमात दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून बोलताना सांगितलं. केंद्र सरकार उत्तराखंडच्या प्रगतीसाठी वचनबद्ध असून आगामी २५ वर्षात राज्यानं विकसित भारतासाठी विकसित उत्तराखंड हे ध्येय समोर ठेवून कार्य करावं, असं ते म्हणाले.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय हॉकी संघटनेतर्फे ओमानमध्ये ४९वे एफआयएच पुरस्कार २०२४ जाहीर करण्यात आले. भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंगला वर्षातल्या सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडूचा पुरस्कार जाहीर करण्यात आला तर माजी खेळाडू पीआर श्रीजेशला वर्षातील सर्वोत्तम गोलरक्षक म्हणून गौरविण्यात आलं आहे. चीनच्या ये जियाओलाही वर्षातल्या सर्वोत्तम गोलरक्षकाचा आणि अर्जेंटिनाच्या जो डियाज आणि पाकिस्तानच्या सुफियान खान यांना एफआयएच रायझिंग स्टार्सचा पुरस्कार मिळाला.

चीन महिला संघाच्या मुख्य प्रशिक्षक एलिसन अन्नान यांना महिला विभागात वर्षातल्या सर्वोत्तम प्रशिक्षकाचा पुरस्कार तर पुरुष गटात जेरॉन डेल्मी यांना वर्षातल्या सर्वोत्तम प्रशिक्षक पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. स्कॉटलंडच्या सारा विल्सन आणि ऑस्ट्रेलियाच्या स्टीव्ह रॉजर्स यांनी अनुक्रमे महिला आणि पुरुष गटात वर्षातले सर्वोत्तम पंच पुरस्कार पटकावले.

**<><><><>**

भारताच्या पंकज अडवाणीनं कतारमधे दोहा इथं सुरू असलेल्या जागतिक बिलियर्ड्स अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत काल त्यानं सौरव कोठारीचा ४-२ असा पराभव केला. सौरवला कांस्यपदक

मिळालं. अंतिम फेरीत पंकज अडवाणीचा सामना इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलशी होणार आहे. हॉलनं सिंगापूरच्या पीटर गिलख्रिस्टचा ४-१ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानात बलुचिस्तानमधे क्वेट्टा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या बॉम्बस्फोटात २४ जणांचा मृत्यु झाला तर ४०हून अधिक जण जखमी झाले. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. घटनास्थळी पोलीस, बचाव पथक आणि बॉम्बशोधक पथक दाखल झालं असून मदतकार्य सुरु आहे. जाफर एक्स्प्रेस स्थानकातून निघत असताना हा स्फोट झाला. स्फोटाच्या वेळी स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी होती. या संपूर्ण प्रकरणाचा तपास केला जात असून अद्याप कोणत्याही संघटनेनं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही.

**//<><><><><>//**